# सेवक वार्ता

e-mail : http://www.mahasevak.com

अंक ३, वर्ष - १ जानेवारी २०२१

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, पुणे**

**नोंदणीकृत कार्यालय -ब-८, सारसनगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२**

**संपादकीय** -

सेवा वार्ता सुरु करुन २ महिने झाले व कोविड - १९ मुळे टाळेबंदी सुरु झाली व हे बंद झाले. सुदैवाने कॅम्पाचे क्षेत्रीय काम पुर्ण झाले असल्याने रिपोर्ट तयार करणे, सादर करणे इ.कामे पुर्ण होऊ शकली याचेच समाधान ! मध्यंतरीच्या काळात अनेक बऱ्या वाईट घटना घडल्या.

त्यातील महत्वाच्या म्हणजे २६ जून २०२० रोजी अमरावती वृत्तातील सक्रिय सदस्य श्री.विजय सखाराम भोसले यांचा स्वर्गवास ही अतिशय दु:खद घटना घडली. त्यांना श्रध्दांजली म्हणून त्यांच्या वृत्तपत्रातील वृक्षांच्या प्रकाशित माहितीवरील प्रस्तावित 'वृक्षधन' हे पुस्तक आता प्रकाशनाचे शेवटच्या टप्प्यात आहे.

ही घटना ताजी असतानाच सेवकचे आधारस्तंभ श्री. गोगटे साहेब हे २५ सप्टेंबर रोजी कोविड-१९ शी ३ आठवडे लढा देऊन आम्हाला सोडून गेले. त्यांच्या स्मरणार्थ सेवक एक स्मरणिका प्रकाशित करत आहे.

या दरम्यान महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळाचे बांबू मुल्यांकनाचे काम सेवकला मिळाले व या कामाचा सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. नागपूर वृत्ताची सेवकची नविन कार्यकारीणी जाहीर झाली. बांबू मूल्यांकनाचे काम सुरु झाले.

या दरम्यान सेवक धुळे वृत्तामार्फत बारीपाडा रानभाज्याचे पुस्तक तयार करण्यात आले व त्याचे विमोचन वनभवन पुणे येथे दि. ३० डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी पार पडले.

दरम्यान दि. ११/१/२०२१ रोजी आणखी एक सेवकचे खरे समर्थक डॉ. राधाकृष्ण ल. चौधरी आम्हाला सोडून गेले. या सर्व दिवंगत सेवक सदस्यांना आम्हा सर्वांची विन्रम श्रध्दांजली !!

सेवक वार्ताचे काम आपण पुन्हा सुरु करीत आहोत. सर्वांना विनंती की त्यांचेकडील घडामोडींबाबतची माहिती छायाचित्रांसह ईमेल अथवा व्हाट्सअप द्वारे आमचेकडे पाठवावी.

नववर्ष शुभेच्छांसह !

डॉ. शे. हिं. पाटील
संपादक, सेवक वार्ता

**सेवकची मासिक कार्यकारिणी सभा संपन्न –** पुणे दि.०३/०३/२०२० सेवकची मार्च महिन्याची मासिक सभा सेवकचे नोंदणीकृत कार्यालयात आज दि.०३/०३/२०२० रोजी संपन्न झाली. सभेत अध्यक्ष श्री. शिरीष अस्थाना, कार्यकारी अध्यक्ष डॉ. शे. हिं. पाटील, सदस्य श्री. व्हि. एस. जोशी, श्री. वि.त्र्यं. पत्की, श्री. सुधाकर डोळे, श्री. संभाजी गवळी, श्री. रामकृष्ण आडकर, खजिनदार श्री.उमेश धोपेश्वरकर व सदस्य सचिव श्री. डावरे हे हजर होते. या बैठकीस दास चे श्री मंगेश देसाई, मुंबई हे विशेष करुन उपस्थित होते. या प्रसंगी श्री. निखील गावडे यांना कॅम्पा कामाचे डेटा ॲनॅलिसिसबाबत सूचित करण्यात आले.



या प्रसंगी सेवकच्या दुस-या अंकाचे विमोचन करण्यात आले.

**श्री. संभाजी गवळी जानेवारी २०२० चे वाटर हिरो** भारत सरकारचे डिपार्टमेंट ऑफ वाटर रिसोर्सेस, रीव्हर डेव्हलपमेंट अँड गंगा रिजुव्हेनेशन जलशक्ती मंत्रालयातर्फे श्री. संभाजी गवळी यांची निवड करण्यात आली. श्री. संभाजी गवळी हे सेवकचे धुळे शाखेचे अध्यक्ष आहेत. त्यांचे निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन !!

**श्री. वसंत जोशी यांचे योगप्रभावचे इंग्रजी भाषांतर प्रसिध्द –**

सेवकचे आधारस्तंभ श्री. वसंत जोशी यांचे संत श्री.गुलाबराव महाराज लिखित पातंजली योग सुत्रावरील भाष्य योग प्रभावचे भाषांतर 'योगा इनफलुयंस' (Yoga influence) नुकतेच प्रसिध्द झाले आहे.

या पुस्तकास डॉ. विजय भाटकर यांनी प्रस्तावना लिहीली आहे.




श्री. वसंत जोशी यांचे या अद्वितीय कार्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

**दि. ४/७/२०२० रोजी दिवंगत वन अधिकारी यांचे स्मृति प्रित्यर्थ वृक्षारोपण**

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, अमरावती तर्फे अमरावती सेवक संघातील दिवंगत वन अधिकारी यांचे स्मृति प्रीत्यर्थ वृक्षारोपण करण्याचा कार्यक्रम घेण्यात येतो.



या वर्षी स्व. श्री. गाडबैल स्व. श्री. वाहाणे आणि स्व. श्री. भोसले यांचे आवडीचे वृक्ष लागवड त्यांचे कुटुंबीय यांचे हस्ते स्मृति वन मासोद, अमरावती येथे सेवक सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



या प्रसंगी दिवंगत व अधिकाऱ्यांना आवडणाऱ्या वृक्षाचीच निवड करण्याची प्रथा सेवक संघाने जोपासली आहे. यामुळे स्मृति वनात विविध वृक्ष प्रजातींचे संवर्धन व गुणन सुध्दा होते.

हे स्मृती वन सामाजिक वन विभागातर्फे सन २००३ पासून सुरु करण्यात आले असून रु.१००० देणगी शुल्क घेवून ही वृक्ष सांभाळण्याचे महत्वाचे कार्य वनविभाग करीत आहे.

**रानभाज्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन**

दि. ३०-१२-२०२० पुणे-आज सायंकाळ वनभवन, पुणे येथे बारीपाडा येथील रानभाज्याच्या माहितीच्या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

यावेळी मुख्य वनसंरक्षक शिक्षण प्रशिक्षण श्री. रविंद्र वानखेडे, वनसंरक्षक वन्यजीव पुणे श्री. रमेशकुमार, वनसंरक्षक कार्यआयोजना श्री. लडकत, उपवनसंरक्षक कार्यआयोजना श्री. विठ्ठल सुर्यवंशी हे मुख्यत्वे हजर होते.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. वि.त्र्यं. पत्की हे होते. या कार्यक्रमास सेवानिवृत्त वनकर्मचारी (सेवक) संघ, पुणे चे अध्यक्ष श्री. शिरिष अस्थाना, कार्यकारी अध्यक्ष डॉ.शे. हिं. पाटील, श्री. राजेंद्र कदम हे प्रामुख्याने हजर होते. या कार्यक्रमासाठी धुळे शाखेचे सेवकचे अध्यक्ष श्री. संभाजी गवळी ज्यांनी ही पुस्तिका तयार केली ते दृकश्राव्य माध्यमाद्वारे हजर होते. श्री. संभाजी गवळी यांचे व सेवक संघाचे मान्यवरांनी या प्रसंगी अभिनंदन कले. या पुस्तिकेत नंदुरबार जिल्हयातील बारीपाडा या आदिवासी भागात मिळणाऱ्या रानभाज्यांची थोडक्यात सचित्र माहिती देण्यात आली आहे.

---

प्रकाशक : सेवक, पुणे
संपादन : डॉ. शे. हिं. पाटील, भावसे (सेवानिवृत्त) प्रधान मुख्य वनसंरक्षक